पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६६६/२०१५
दिनांक : १४/०९/२०१५

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.


विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक १८/०९/२०१५ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/०९/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2015 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.विधी समिती सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – २

दिनांक – १८/०९/२०१५ वेळ – दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १८/०९/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक २१/०७/२०१५, ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) सभावृत्तांत कायम करणे.

इ) दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” अभिनामाची ८ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर सद्यस्थितीत रिक्त असलेले १ पद पदोन्नतीने भरणेकरीता दि.१७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक “ उप अभियंता (विद्युत)” पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कालावधी इ. सेवाविषयक तपशील पडताळून श्री.मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाचे पदविकाधारक व पदवीधारक अशा स्वतंत्रपणे सेवाजेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत व त्यानुसार उपअभियंता (विद्युत) पदावर पदोन्नती देण्याबाबत मे.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असलेली याचिका क्र.२१४५/२००५ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे. सबब मोरे शशिकांत सखाराम यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून “ कार्यकारी अभियंता (विद्युत)” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० –


३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) मनपाचे जोग महाराज उद्यानातील लॉनचे नुतनीकरण करणे कामीचे रक्कम रु.१७,७६,६५०/- (अक्षरी र.रु.सतरा लाख शहात्तर हजार सहाशे पन्नास फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष यांनी त्यांचे दि.१३/०७/२०१५ रोजीचे मा.महापौर व मा.आयुक्त यांना दिलेल्या निवेदनानुसार मा.हरीत लवादाने आळंदी नगरपरिषदेस प्रक्रिया प्रकल्प उभारेपर्यंत कच-याची पर्यायी व्यवस्था करणेचे आदेश दिल्याने तसेच आळंदी ही तिर्थक्षेत्र असून लाखो भाविक शहरात येत असतात तसेच लग्नसराईत येणा-या भाविकांचा विचार करता कचरा प्रक्रियेची सुविधा तयार होईपर्यंत मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकण्यास परवानगी मागितलेली आहे. यापूर्वी आळंदी नगरपरिषदेने दि.२८/०३/२००८ व दि.१०/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये मनपाचे मोशी कचरा डेपो येथे कचरा टाकणेस परवानगी मागितली होती. त्यानुसार प्रथमत: आळंदी नगरपरिषदेस दि.३०/०६/२००८ अखेर पर्यंत एकूण ८४१.६१० मे.टन कचरा प्रती किलो ५० पैसे या प्रमाणे काही अटी व शर्तीनुसार मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. तसेच दि.०६/०६/२०१२ ते १२/०६/२०१२ या कालावधीमध्ये प्रतीदिनी सुमारे ८ मे.टन इतका कचरा र.रु.२५६/- प्रति टन या प्रमाणे आकारणी करून काही अटी व शर्तीवर परवानगी देणेत आली होती. याकामी त्याचे मार्फत एकूण ८० मे.टन कच-यासाठी र.रु.२०,४८०/- इतके शुल्क मनपा कोषागारामध्ये जमा करणेत आले होते, परंतु प्रत्यक्षामध्ये आळंदी नगरपरिषदेमार्फत दि.०६/०६/२०१२ व दि.०८/०६/२०१२ या कालावधीमध्ये एकूण६.९५ मे.टन इतका कचारा मोशी कचरा डेपोमध्ये टाकणेत आला होता. उपरोक्त बाबींचे अवलोकन करता आळंदी नगरपरिषदेची सद्यस्थितीमधील लोकसंख्या व तरंगती लोकसंख्येनुसार कच-याचे प्रमाणामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. मनपाचे परिसरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या कच-याचे प्रमाणात देखील मोठया प्रमाणात वाढ होत आहे. मनपाच्या कचरा डेपोमधील बहुतांश जागा वापरणेत आली असून उर्वरित जागा जास्तीत जास्त पुढील ३ ते ४ वर्ष कालावधीसाठी वापरणे शक्य होईल. मनपाच्या मोशी कचरा डेपो येथील उपलब्ध जागेचा विचार करता त्याचप्रमाणे शहराबाहेरील कचरा मोशी कचरा डेपोमध्ये टाकण्यास स्थानिक लोकप्रतिनिधींचा विरोध होण्याची शक्यता असल्याने आळंदी नगरपरिषदेस कचरा टाकणेस परवानगी देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असून यास मनपा सभेची मान्यता घेणे योग्य होईल. आळंदी नगरपरिषदेचा निर्माण होणारा कचरा त्यांचे कडील प्रक्रीया प्रकल्प पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी मोशी कचरा डेपोमध्ये सशुल्क व

आवश्यक त्या अटी शर्तीवर टाकणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) भोसरी स्मशानभुमीमधील विद्युत दाहिनीचे ठेका पध्दतीने चालन, देखभाल व दुरुस्तीचे काम करणे या कामाच्या र.रु.३३,४८,३३५/- ( अक्षरी र.रु.तेहतीस लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे पस्तीस फक्त ) इतक्या सुधारित खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/६६६/२०१५
दिनांक : १४/०९/२०१५